# संस्कार मंदिर संस्थेचे
# कला आणि वाणिज्य महाविद्यालय, वारजे माळवाडी
### जि.पुणे.

==========================================================

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

Date: 17/12/2019

## विशेष श्रमसंस्कार शिबीराचा अहवाल

राष्ट्रीय सेवा योजना विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या निर्देशानुसार समाज शिक्षण मंडळ संचलित अमृतेश्वर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, विंझर ता. वेल्हा, जि. पुणे व संस्कार मंदीर संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय वारजे माळवाडी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मौ. पींपरी ता. वेल्हा, जि. पुणे याठिकाणी ‘स्वच्छ भारत स्वस्थ भारत’ ‘सक्षम युवा सशक्त भारत’ याच्या अंतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन दिनांक १० डिसेंबर २०१९ ते १६ डिसेंबर २०१९ दरम्यान करण्यात आले.

**मंगळवार दिनांक १० डिसेंबर २०१९** रोजी सकाळी १०.३० वाजता विशेष श्रमसंस्कार शिबीराचा उद्‌घाटन समारंभ आयोजित करण्यात आला. उद्‌घाटन समारंभाच्या अगोदर संपूर्ण स्वयंसेवक सकाळी ७.३० वाजता शिबीरस्थळी पोहचले त्यानंतर त्यानी संपूर्ण परिसराची स्वच्छता केली. शिबीराच्या उद्‌घाटन प्रसंगी प्रमुख उद्‌घाटक म्हणुन समाज शिक्षण मंडळ, विंझरचे कार्याध्यक्ष मा.श्री. प्रदीप शिवराम फडके उपस्थित होते. प्रमुख पाहूणे म्हणून वेल्हा पोलीस स्टेशनचे एपीआय मा. श्री. देवकर उपस्थित होते, त्याचबरोबर समाज शिक्षण मंडळाचे संचालक मा. श्री. संभाजी भोसले, अमृतेश्वर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, विंझरचे प्राचार्य डॉ. संजिव लाटे, कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीलीप भोईटे, पींपरीचे गावचे

सरपंच मा. श्री. मारूती शिर्के, मा. श्री. संतोष मोरे, प्रा. डॉ. बाळासाहेब केंदळे उपस्थित होते. सदर समारंभाचे निवेदन प्रा. किरण जाधव यांनी केले, प्रास्ताविक प्रा. अनुजा गावडे तर आभार डॉ. दिपक शिंदे यांनी केले.

**बुधवार दिनांक ११ डिसेंबर २०१९** रोजी सकळी ०६ ते ०७.३० दरम्यान योगा, प्रार्थना घेण्यात आली ७.३० ते ८.०० नाष्टा, ८.०० ते १२.४५ दरम्यान गावातील पाणीपुरवठा पाईपलाईनसाठी श्रमदान करण्यात आले. १.०० ते २.०० दरम्यान दुपारचे जेवण तर २.३० ते ५.०० दरम्यान व्याख्यानमालेमध्ये मा.डॉ. अमित गोगावले, डॉ. शिंदे, डॉ. विद्यासागर यांनी प्रबोधनपर विचार मांडले. सांयकाळी ७.३० नंतर ग्रामस्थांसाठी स्वयंसेवकानी प्रबोधनापर उपक्रम राबविले व रात्री १०.३० वाजता आढावा बैठकीसह दिवसाची समाप्ती करण्यात आली.

**गुरूवार दिनांक १२ डिसेंबर २०१९** रोजी सकळी ०६ ते ०७.३० दरम्यान योगा, प्रार्थना घेण्यात आली ७.३० ते ८.०० नाष्टा, ८.०० ते १२.४५ दरम्यान गावातील पाणीपुरवठा पाईपलाईनसाठी श्रमदान करण्यात आले. १.०० ते २.०० दरम्यान दुपारचे जेवण तर २.३० ते ५.०० दरम्यान व्याख्यानमालेमध्ये मा.श्री ह.भ.प. हांडे महाराज यांनी शिवचरित्राची मांडणी विद्यार्थ्यासमोर केली. डॉ. भारत राठोड वाडिया महाविद्यालय, पुणे यांनी प्रबोधनपर विचार मांडले. सांयकाळी ७.३० नंतर ग्रामस्थांसाठी स्वयंसेवकानी प्रबोधनापर उपक्रम राबविले व रात्री १०.३० वाजता आढावा बैठकीसह दिवसाची समाप्ती करण्यात आली.

**शुक्रवार दिनांक १३ डिसेंबर २०१९** रोजी सकळी ०६ ते ०७.३० दरम्यान योगा, प्रार्थना घेण्यात आली ७.३० ते ८.०० नाष्टा, ८.०० ते १२.४५ दरम्यान गावातील पाणीपुरवठा पाईपलाईनसाठी श्रमदान करण्यात आले. १.०० ते २.०० दरम्यान दुपारचे जेवण तर २.३० ते ५.०० दरम्यान व्याख्यानमालेमध्ये मा.डॉ. शितल शेंडकर यांनी प्रथमोपचारासंबधीत विद्यार्थ्यासमोर प्रात्यक्षिके केली. डॉ. ललीता कानगुडे यांनी स्त्रिवाद म्हणजे नेमक काय यावर प्रबोधनपर विचार मांडले.

सांयकाळी ७.३० नंतर ग्रामस्थांसाठी स्वयंसेवकानी प्रबोधनापर उपक्रम राबविले व रात्री १०.३० वाजता आढावा बैठकीसह दिवसाची समाप्ती करण्यात आली.

**शनिवार दिनांक १४ डिसेंबर २०१९** रोजी सकळी ०६ ते ०७.३० दरम्यान योगा, प्रार्थना घेण्यात आली ७.३० ते ८.०० नाष्टा, ८.०० ते १२.४५ दरम्यान गावातील पाणीपुरवठा पाईपलाईनसाठी श्रमदान करण्यात आले. १.०० ते २.०० दरम्यान दुपारचे जेवण तर २.३० ते ५.०० दरम्यान व्याख्यानमालेमध्ये मा.ॲड. प्रभाकर सोनावणे पुणे न्यायालय यांनी डॉ. बाबासाहेबांचे विचार विद्यार्थ्यासमोर मांडले त्यामध्ये त्यांनी अनेक दुर्लक्षित पैलूवर प्रकाश टाकला. प्रा. नामदेव डोके, प्रा. मारूती शिंदे यानीही प्रबोधनपर विचार मांडले. सांयकाळी ७.३० नंतर ग्रामस्थांसाठी स्वयंसेवकानी प्रबोधनापर उपक्रम राबविले व रात्री १०.३० वाजता आढावा बैठकीसह दिवसाची समाप्ती करण्यात आली.

**रविवार दिनांक १५ डिसेंबर २०१९** रोजी सकळी ०६ ते ०७.३० दरम्यान योगा, प्रार्थना घेण्यात आली ७.३० ते ८.०० नाष्टा, ८.०० ते १२.४५ दरम्यान गावातील पाणीपुरवठा पाईपलाईनसाठी श्रमदान करण्यात आले. १.०० ते २.०० दरम्यान दुपारचे जेवण तर २.३० ते ५.०० दरम्यान व्याख्यानमालेमध्ये डॉ. परमेश्वर गडकर, डॉ. संजय गिरी यांनी डॉ. बाबासाहेबांचे आर्थिक विचार विद्यार्थ्यासमोर मांडले त्यामध्ये त्यांनी अनेक दुर्लक्षित पैलूवर प्रकाश टाकला. ५.२० ते ६.१० दरम्यान गावामध्ये ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले. स्वयंसेवकानी प्रबोधनपर घोषनासह गावकरी वर्गाला सहभागी करून घेतले. सांयकाळी ७.३० नंतर ग्रामस्थांसाठी स्वयंसेवकानी प्रबोधनापर उपक्रम राबविले व रात्री १०.३० वाजता आढावा बैठकीसह दिवसाची समाप्ती करण्यात आली.

**सोमवार दिनांक १६ डिसेंबर २०१९** रोजी सकळी ०६ ते ०७.३० दरम्यान योगा, प्रार्थना घेण्यात आली ७.३० ते ८.०० नाष्टा, ८.०० ते १२.४५ दरम्यान गावातील पाणीपुरवठा पाईपलाईनसाठी

श्रमदान करण्यात आले. १.०० ते २.०० दरम्यान दुपारचे जेवण तर २.३० ते ४.०० दरम्यान गावचे ग्रामसर्वेक्षण केले त्याचबरोबर स्वच्छता मोहीमही राबवीली. व ४.ते ६.१० दरम्यान शिबीराच्या समारोपाचा समारंभ पार पडला.

शिबीराच्या समारोप प्रसंगी अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. दिलीप भोईटे तर प्रमुख पाहूणे म्हणून डॉ.डोंगरे महादेव, डॉ. सुरेश मुळूक व डॉ. थोरात उपस्थित होते. त्याचबरोबर सदर उपक्रमाचे निवेदन स्वयंसेवकाने केले. समारोपाचे प्रास्ताविक कार्यक्रमअधिकारी प्रा. डॉ. परमेश्वर गडकर यांनी केले तर आभार प्रा. अनुजा गावडे यांनी मानले आणि समारंभाची सांगता झाली सर्व उपस्थित पाहूणे व स्वयंसेवकाना जेवण देउन या दिवसाची सांगता झाली. सदर उपक्रमास एम.न्यूजचे पत्रकार प्रा. किरण जाधव उपस्थित होते.

**शैक्षणिक वर्षे २०१९-२० मध्ये पींपरी ता. वेल्हा, जि. पुणे याठिकाणी आयोजित कराण्यात आलेलया शिबीराच्या एकूण सात दिवसाच्या कालावधीमध्ये श्रमदानामधून ग्रामस्थासाठी ८६२४ मीटर खोदकाम करण्यात आले त्याचा परिणाम म्हणून ७२ कुटूंबाच्या दारामध्ये नळाव्दारे पाणी पोहचले. त्याचबरोबर ग्रामस्वच्छता, ग्रामसर्वेक्षण व इतर प्रबोधनपर उपक्रमही राबविण्यात आले.**

कार्यक्रम अधिकारी

डॉ. संजय गिरी